दैनिक केसरी दि. ४ जुलै १९९२

# ताराराणी विद्यापीठातर्फे गृहशास्त्र विभागाचे वर्ग

कोल्हापूर : गृहशास्त्र विभागाचे पदव्युत्तर वर्ग ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमार्फत या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहेत. या प्रकारचे दक्षिण महाराष्ट्रातील हे पहिलेच महाविद्यालय ठरले आहे आणि त्याला विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मान्यताहि मिळाली आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले की, एम. ए. होम सायन्स या नावाने ही पदव्युत्तर पदवी ओळखली जाणार आहे. मुंबई, नागपूर या सारख्या विद्यापीठांचा अपवाद वगळल्यास महाराष्ट्रात अन्यत्र कोठेहि असा अभ्यासक्रम शिकविला जात नाही. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातइतकेच नव्हे तर, कोकण, पुणे या सारख्या क्षेत्रातहि ही सुविधा अन्यत्र उपलब्ध नाही आणि आमच्या महाविद्यालयात ती प्रथमच उपलब्ध होत आहे. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाचा पहिला वर्ग या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहे त्यासाठी पंधरा विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाईल.

एका प्रश्नाला उत्तर देताना प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने या महाविद्यालयाला कायम संलग्नीकरणाला मान्यता दिली आहे. महाविद्यालयाकरिता लागणारा तज्ज्ञ अद्यापक वर्गहि उपलब्ध आहे. दोन वर्षात एकूण आठ विषयांच्या प्रश्नपत्रिका आहेत त्यातील ग्रह व्यवस्थापन आधी चार विषय पहिल्या वर्षी शिकविण्यात येतील.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानाबद्दल बोलताना ते म्हणाले की, कमला कॉलेजच्या शैक्षणिक सुविधा आणि प्रगति पाहून अनुदान मंडळाने यावर्षी ९. लाख रुपये मंजूर केले आहेत. त्यातील ३ लाख ग्रंथालय इमारतीसाठी, दीड लाख ग्रह शास्त्र विभाग उपकरणांसाठी, १ लाख २५ हजार पुस्तकांसाठी व २५ हजार अन्य उपक्रम राबवण्यासाठी असे एकूण ६ लाख रुपये यावर्षी खर्च होणार आहेत. उर्वरित अनुदान विद्यापीठ अनुदान मंडळाकडे निधी उपलब्ध होताच देण्यात येणार आहे.